

आरोग्य सेवांवर लोकाधारित देखरेख व
नियोजन प्रक्रिया प्रकल्पातंर्गत आयोजित

# आरोग्य ग्रामसभा

## आयोजनाचे अनुभव व मार्गदर्शनपर पुस्तिका

राष्ट्रीय आरोग्य अभियान

# : मा. आयुक्त यांचा :
# शुभसंदेश

डॉ. अनूप कुमार यादव, भा.प्र.से.
आयुक्त, आरोग्य सेवा व
अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान

महाराष्ट्र शासन
आयुक्त, आरोग्य सेवा व
अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान
राज्य आरोग्य सोसायटी, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे कार्यालय
आरोग्य भवन, ३ रा मजला, सेंट जॉर्ज रुग्णालय आवार,
पी. डिमेलो रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
दूरध्वनी : ०२२-२२६२०२३५ फॅक्स : ०२२-२२६४२१५५
ईमेल : mdnrhm.mumbai@gmail.com
www.nrhm.maharashtra.gov.in

## शुभसंदेश

राष्ट्रीय आरोग्य अभियानतंर्गत प्रत्येक महसूली गावात ग्राम आरोग्य, पोषण,पाणीपुरवठा व स्वच्छता समिती कार्यरत आहेत. या समिती अतंर्गत २४ एप्रिल ते १ मे या कालावधीत नियमित आरोग्य ग्रामसभा आयोजित करण्यात असे शासन परिपत्रक निर्गमित करण्यात आले आहे. परंतु आरोग्य ग्रामसभा आयोजित करण्याचे प्रमाण अत्यंत कमी आहे, सन २०१९-२० या आर्थिक वर्षात लोकाधारित देखरेख व नियोजन प्रकल्पाच्या माध्यमातून प्रकल्प राज्य नोडल संस्थांच्या सहकार्याने काही जिल्हयांमध्ये आरोग्य ग्रामसभा राबविण्यात आल्या आहेत.

लोकाधारित देखरेख व नियोजन प्रकल्पाच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या आरोग्य ग्रामसभांचा सकारात्मक परिणाम आपल्यापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न आरोग्य ग्रामसभा आयोजनाचे अनुभव व मार्गदर्शन या पुस्तिकेच्या माध्यमातून करत आहोत. सदरचे अनुभव हे लोकाधारित देखरेख व नियोजन प्रकल्पाशी संबधित जिल्हयांपर्यत मर्यादित न राहता सर्व ग्राम आरोग्य, पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समिती यांना मार्गदर्शक आहेत. या पुस्तिकेचा वापर आपण आपल्या गावाच्या विकासासाठी करुन घेणे आवश्यक आहे. आरोग्य ग्रामसभा आयोजनासाठी या पुस्तिकेचा ग्राम आरोग्य पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समिती सदस्यांच्या माध्यमातून गावातील जनतेला फायदा होणेसाठी नक्कीच उपयोग होईल.

हार्दिक शुभेच्छा !

(डॉ. अनूप कुमार यादव)

# : प्रस्तावना :

## प्रस्तावना

राष्ट्रीय आरोग्य अभियानतंर्गत १७ जिल्हयांमध्ये लोकाधारित देखरेख व नियोजन प्रकल्प राबविण्यात येत आहे. राज्यात सन २००८ पासुन लोकाधारित देखरेख व नियोजन प्रकल्प ही योजना स्वयंसेवी संस्थांच्या सहभागाने राबविण्यात येत आहे. लोकसहभागातून लोकांचा आरोग्य दर्जा उंचावणे, आरोग्य विषयक योजनांची माहिती उपलब्ध करुन देणे, आरोग्य संस्थांच्या माध्यमातून दर्जेदार व गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा मिळणेसाठी प्रयत्न करणे, जनता व आरोग्य संस्था यांच्या माध्यमातून जनसंवाद घडवून आणणे, गावातील ग्राम आरोग्य, पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समिती कार्यक्षम बनविणे इ. कार्यक्रम याप्रकल्पाच्या माध्यमातून राबविण्यात येतात.

महसूली गावांमध्ये ग्राम आरोग्य, पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समिती कार्यरत आहेत. सन २०१४ च्या शासन परिपत्रकान्वये प्रत्येक आर्थिक वर्षात २४ एप्रिल ते १ मे या कालावधीत ग्राम आरोग्य, पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समितीच्या माध्यमातून नियमित आरोग्य ग्रामसभा आयोजित करणे आवश्यक आहे. त्यानुसार सन २०१९-२० या आर्थिक वर्षात लोकाधारित देखरेख व नियोजन प्रकल्पाच्या माध्यमातून प्रकल्प नोडल संस्थांच्या सहकार्याने काही जिल्हयांमध्ये आरोग्य ग्रामसभा राबविण्यात आल्या आहेत. आरोग्य ग्रामसभा घेणे का आवश्यक आहे, आरोग्य ग्रामसभेचे महत्व व आरोग्य ग्रामसभा आयोजनानंतरचे सकारात्मक बदल याबाबत पुस्तिकेमध्ये माहिती देण्यात आली आहे. ग्राम आरोग्य, पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समितीने या पुस्तिकेचा वापर केल्यास गावासाठी नक्कीच फायदा होणार आहे. या दृष्टीने ही पुस्तिका तयार करण्यात आली आहे.

पुस्तिका तयार करणे कामी सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्रधान सचिव मा. डॉ. प्रदीप व्यास (भा.प्र.से.) यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले, त्यांचे मी. मन:पूर्वक आभार मानतो. तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान महाराष्ट्र आयुक्त (आरोग्य सेवा) व अभियान संचालक मा. डॉ. अनूप कुमार यादव (भा.प्र.से), संचालक मा. डॉ. साधना तायडे, संचालक- २ राज्य कुटुंब कल्याण मा. डॉ. अर्चना पाटील व अतिरिक्त अभियान संचालक रा.ग्रा.आ.अ मा. डॉ. सतिश पवार यांचे मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन या प्रक्रियेस लाभले, या सर्वांचे मन:पूर्वक आभार.

तसेच पुस्तिकेची सजावट करणेकरीता आय.ई.सी ब्युरो उपसंचालक, श्री. कैलास बावीस्कर व त्यांची टीम यांचे मोलाचे सहकार्य लाभले. श्रीमती. मुक्ता गाडगीळ, राज्य वरिष्ठ सल्लागार, एस.एच.एस.आर.सी., श्रीमती. स्वाती पाटील, राज्य कार्यक्रम अधिकारी (सीबीएमपी) व सीबीएमपी कार्यक्रमांतर्गत कार्यरत राज्य नोडल संस्थेच्या प्रतिनिधी श्रीमती. परिणीता कानिटकर, स्टापी स्वयंसेवी संस्था व त्यांची टीम यांनी पुस्तिका बनविण्यात मोलाचे योगदान दिले, त्यांचेही आभार.

ग्राम आरोग्य, पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समितीला ही पुस्तिका नक्कीच उपयुक्त ठरले अशी आशा व्यक्त करतो.

**(डॉ.विजय कंदेवाड)**
**सहसंचालक (तां)**
**राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई**

# दिल्लीत लोकसभा मुंबईत विधानसभा तशी गावात ग्रामसभा (मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1958 कलम 36)

**ग्रामसभा कशासाठी ?**

गावाच्या सर्वांगीण विकासाचे विविध विषय सर्वसामान्यांपर्यंत पोहचविण्याचे प्रभावी माध्यम 'ग्रामसभा' आहे.

**ग्रामसभा आयोजनामध्ये ग्रामपंचायतीची भुमिका**

- ग्रामसभा ही गावातील मतदारांची बनलेली असते.
- प्रत्येक ग्रामपंचायतीची मासिक सभा महिन्यातून एकदा होणे आवश्यक.
- आवश्यकता वाटल्यास ग्रामपंचायतीच्या/ पंचायतीच्या विशेष ग्रामसभेचे आयोजन करता येईल.
- मासिक सभेची नोटीस प्रत्येक ग्राम पंचायत सदस्यास विहित पद्धतीने बजावली पाहिजे व ग्राम पंचायत सूचना फलकावर लावणे आवश्यक.
- सभेचे अध्यक्ष सरपंच असतील व त्यांच्या अनुपस्थितीत उपसरपंच अध्यक्ष राहतील.
- पंचायतीच्या सर्व सदस्यांनी नियमितपणे बैठकांना उपस्थित राहून कामकाजात भाग घेतला पाहिजे.
- गणपूर्ती पत्रिकेनुसार सभेचे कामकाज चालवावे.
- अध्यक्षांच्या परवानगीने विषय पत्रिके व्यतिरिक्त विषयांवर चर्चा करून घेता येईल.
- महत्वाच्या व आर्थिक विषयांचा समावेश विषय पत्रिकेत असावा.
- सर्व लोकांसाठी अध्यक्षांच्या परवानगीने सभा खुली ठेवता येईल.
- सभेपुढे येणाऱ्या विषयांवर बहुमताने निर्णय घ्यावा.
- पंचायतीच्या प्रत्येक सभेचे कामकाज बांधणी केलेल्या पुस्तकात लिहून ठेवले पाहिजे.
- सभेच्या कामकाजात अडथळा येईल असे वर्तन करता कामा नये.
- प्रत्येक आर्थिक वर्षात किमान सहा बैठका घेणे बंधनकारक व दोन सभामंध्ये तीन महिन्यांपेक्षा जास्त अंतर असू नये.
- गणपूर्ती /कोरमसाठी १५% किंवा १०० सदस्यांची उपस्थिती आवश्यक.
- ग्रामसभेच्या सर्व सदस्यांनी (मतदारांनी) ग्रामसभेच्या कामकाजात भाग घेतला पाहिजे.

- ग्रामसभेपूर्वी महिला सभा घेणे कायद्याने बंधनकारक आहे.
- ग्रामसभा घेण्याची मूळ जबाबदारी सरपंचाची आहे.
- गावातील सर्व शासकीय, निमशासकीय व ग्रामपंचायतीचे कर्मचा-यांनी ग्रामसभेच्या बैठकीस उपस्थित राहणे आवश्यक आहे. अनुपस्थितीत कर्मचा-यांचे अनुपस्थितीबद्दल ग्रामसभेने गटविकास अधिकारी यांचेकडे तक्रार केल्यास गटविकास अधिकारी यांनी विहित मुदतीत कार्यवाही करणे बंधनकारक आहे.
- राज्य शासन तसेच केंद्र शासनाच्या व्यक्तिगत लाभाच्या योजनांकरीता लाभार्थीची निवड करण्याचे अधिकार ग्रामसभेस आहे.
- प्रत्येक सहामाहीतून एकदा विकास विषयक कामावर केलेल्या खर्चाचा अहवाल ग्रामसभेपुढे ठेवणे ग्रामपंचायतीस बंधनकारक आहे.





**खरे नाम निष्काम ही ग्रामसभा | झटू सर्व भावे करू स्वर्ग गाव ||**

**कळो हे वळो,देह कार्यी पडू दे || घडू दे प्रभो ! एवढे हे घडू दे ||**

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज**

# आरोग्य ग्रामसभा उपयुक्तता

आर्थिक वर्षात २६ जानेवारी, १ मे, १५ ऑगस्ट व २ ऑक्टोबर या विशेष दिनी नियमित ग्रामसभा आयोजित करण्यात येतात. या ग्रामसभांमध्ये शासनाच्या विविध विभागांच्या माध्यमातून राबविण्यात येणा-या उपक्रमांबाबत, योजनांबाबत चर्चा करण्यात येते. त्यावेळी आरोग्य खात्याशी संबंधित विविध योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहचविणेसाठी वेळेचे बंधन पाहता नियमित ग्रामसभा व्यतिरीक्त आरोग्य ग्रामसभा आयोजन करणे आवश्यक आहे असे निर्दशनास आले.

**आरोग्य ग्रामसभा कशासाठी ?**

- सार्वजनिक आरोग्य खात्याकडून राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहचविणेसाठी.
- जनतेचे आरोग्य विषयक प्रश्न व जनतेला मिळणाऱ्या सुविधाबाबत वेळेवर व शास्त्रोक्त माहिती देणेसाठी.
- विविध आरोग्य विषयक योजनांची ग्रामीण पातळीवर सखोल चर्चा होणेसाठी.
- राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या नवनवीन लोकाभिमुख योजनांची माहिती देणेसाठी.

यासर्व बाबींचा विचार करुन आरोग्य ग्रामसभा आयोजनासाठी ग्राम विकास व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन, शासन परिपत्रक क्रमांक : व्हीपीएम -२०१४ /प्र.क्र. ८० /पंरा -३ दिनांक २६ जून,२०१४ निर्गमित करण्यात आला आहे.

**ग्रामसुधारणेचा मूलमंत्र |सज्जनांनी व्हावे एकत्र |**
**संघटना हेचि शक्तीचे सूत्र |ग्रामराज्य निर्माण करी ||**
**ग्राम व्हावया निरोगी सुंदर | सुधारावे लागेल एकेक घर |**
**आणि त्यातूनहीघरात राहणार | करावा लागेल आदर्श ||**
**ग्रामगीता**

# आरोग्य ग्रामसभा शासनपरिपत्रक

ग्रामसभेमध्ये आरोग्यविषयक जनजागृती
होण्यासाठी आरोग्याबाबतचे विषय
<u>घेण्याबाबत.</u>

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक:- व्हीपीएम-२०१४/प्र.क्र.८०/पंरा-३
बांधकाम भवन २५, मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
दिनांक:- २६ जून, २०१४.

प्रस्तावना -

ग्रामसभा ही ग्रामीण लोकशाही व्यवस्थापनावरील सर्वोच्च यंत्रणा आहे. देशाचा खऱ्या अर्थाने विकास होण्यासाठी ग्रामसभा सर्वात प्रमुख स्रोत मानली जाते. महाराष्ट्र राज्यात ग्रामसभेद्वारे अनेक विषय सर्वसामान्यांपर्यंत पोहचविणे प्रभावशाली होण्याकरीता अनेक विषयांचे ग्रामसभेद्वारे आयोजन करण्यात येते. त्याप्रमाणेच आरोग्य विषयक जनजागृतीचे विषय ग्रामसभेमध्ये घेण्याकरीता आरोग्य विभागाचे मा.मंत्री (आरोग्य) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये "आरोग्य ग्रामसभा" विषय ग्रामसभेत प्राधान्याने मांडून आरोग्य खात्याकडून राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती, जनतेचे आरोग्य विषयक प्रश्न, आरोग्य सेवांची अंमलबजावणी करण्याची पध्दत तसेच राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या नवनवीन लोकाभिमुख योजनांची माहिती देणे, विविध आरोग्य विषयक कार्यक्रम व जनतेला मिळणाऱ्या सुविधाबाबत वेळेवर व शासकीय माहिती देणे सोयीचे होण्याच्यादृष्टीने ग्रामीण पातळीवर सखोल चर्चा होण्याकरीता व मासुली गावांमध्ये आरोग्य विभागाची "आरोग्य ग्रामसभा" आयोजित करण्याची प्रभावीपणे गरज आहे. या उद्देशाने ग्राम स्तरावर वार्षिक आरोग्य विषयक जनजागृतीचे विषय घेऊन ग्रामसभा आयोजित करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते. या परिपत्रकाद्वारे आरोग्य विषयक जनजागृतीकरीता राज्यातील सर्व ग्रामपंचायतीमध्ये अंमलबजावणी करण्यासाठी खालीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहे.

आरोग्य विषयक जनजागृतीचे विषय या ग्रामसभेमध्ये घेण्याबाबतचा कालावधी, उद्दिष्टे व त्यासंबंधीचे विषय खालीलप्रमाणे राहतील:-

परिपत्रक:-
<u>१) ग्रामसभेचा कालावधी:-</u>

वर्षातून एकदा "आरोग्यविषयक जनजागृती ग्रामसभा" या विषय ग्रामसभेमध्ये

क्र.मा.प....

आरोग्यासंबंधीचे विषय घेऊन दि २४ एप्रिल ते १ मे (पंचायत राज ते महाराष्ट्र दिन) या कालावधीमध्येघेण्यात यावेत.

१) या ग्रामसभेची उद्दीष्टे -

1. ग्रामपातळीवरील जनतेस आहार व आरोग्याच्यादृष्टीने विविध योजनांबाबत शास्त्रोक्त माहिती देणे.
2. ग्रामपातळीवरील जनतेस विविध आहार व आरोग्य योजनांचा लाभ घेण्यासाठी प्रोत्साहित करणे.
3. आहार व आरोग्यविषयक योजनांच्या नियोजनांमध्ये जनतेचा सहभाग वाढविणे
4. गावच्या पंचक्रोशितील आरोग्य संस्थांबाबत माहिती देणे
5. आरोग्य संस्थेत उपलब्ध असलेले विविध कार्यक्रम, सेवा व सुविधांबाबत माहिती देणे.
6. आरोग्य सुविधा पुरविणाऱ्या यंत्रणेबाबत माहिती देणे.
7. ग्रामपातळीवर पुरविण्यात येणाऱ्या ग्राम आरोग्य पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समिती अंतर्गत संबंधित निधी वापराबाबत नियोजन करणे.

२) या ग्रामसभेमध्ये आरोग्यविषयक चर्चा करावयाचे विषय-

1. माता संगोपन व बाल संगोपन.
2. जननी शिशू सुरक्षा योजना
3. नियमित लसीकरण
4. ग्राम बालविकास केंद्र
5. बाल उपचार केंद्र
6. पोषण पुनर्वसन केंद्र
7. आजार नियंत्रण प्रकल्प
8. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम
9. ग्राम आरोग्य पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समिती
10. मोबाईल मेडिकल युनिट
11. आदिवासी भागांकरीता विशेष योजना
12. रुग्ण कल्याण समिती
13. राष्ट्रीय आरोग्यविषयक कार्यक्रम
14. टोल फ्री दूरध्वनी क्र. १०२, १०४, १०८ बाबत माहिती
15. आहार.

२.    ग्रामीण जनतेचे आरोग्य सुधारण्यासाठी आरोग्यविषयक विषय या ग्रामसभेमध्ये घेणे अत्यंत गरजेचे आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियाना अंतर्गत ग्रामपातळीवर निधी वितरीत करण्यात येतो व या निधीचे योजनाबध्द पध्दतीने खर्च होण्याच्यादृष्टीने दि.२४ एप्रिल ते १ मे (पचायत राज ते महाराष्ट्र दिन) या कालावधीमध्ये या विषयाबाबत ग्रामसभा घ्यावी. तसेच या ग्रामसभेचे आयोजन सर्व ग्रामपंचायतींना कळवून त्याप्रमाणे सभा होतील याची दक्षता घ्यावी.

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने

(डॉ. नरेश गिते) 26/6/14.
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१.  मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२.  मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
३.  मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
४.  मा. मुख्य सचिव महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुबई-३२
५.  मा. मंत्री ग्राम विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
६.  मा. राज्यमंत्री ग्राम विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
७.  सर्व मा. विधानसभा / विधानपरिषदेचे सदस्य
८.  सर्व प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
९.  सर्व विभागीय आयुक्त,
१०.  महासंचालक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे.
११.  आयुक्त, कुटुंब कल्याण व संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुबई.
१२.  अवर सचिव, आरोग्य-७, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३.  सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१४.  सर्व जिल्हा परिषदांचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत),
१५.  सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती,
१६.  सर्व मंत्रालयीन विभाग
१७.  ग्राम विकास व जलसंधारण विभागातील सर्व पर्यवेक्षकीय अधिकारी व कार्यासन अधिकारी
१८.  निवडनस्ती (कार्यासन क्रमांक पंरा-3).

*****

# आरोग्य ग्रामसभा आयोजनाचे सकारात्मक बदल


**जिल्हा- रायगड, तालुका –कर्जत**
**प्राथमिक आरोग्य केंद्र- कडाव**
**गाव –भिवपुरी**
**स्वयंसेवी संस्था - दिशा केंद्र**
**आरोग्य ग्रामसभा दिनांक -१४/०५/२०१९**

- भिवपुरी गावात पूर्वी ग्राम आरोग्य सभेंचे आयोजन नियमित नव्हते. त्यामुळे गावातील व वाडीतले प्रश्न नियमित सुटत नव्हते. आरोग्य ग्रामसभा आयोजनाविषयी उदासिनता होती. लोकसहभागाचा अभाव असल्याचे स्पष्ट दिसत होते.आरोग्य सेवांवर लोकाधारित देखरेख व नियंत्रण प्रक्रिया प्रकल्प कार्यकर्त्यांनी भिवपुरी गावातील आरोग्य ग्रामसभा यशस्वी करण्याचा जणू चंगच बांधला.गावातील ग्रामस्थ, सरपंच, सदस्य व ग्रामसेवकांबरोबर एकत्रित नियोजन बैठकानंतर दि.१४/०५/२०१९ रोजी भिवपुरी ग्रामपंचायतीत आरोग्य ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले.

**आरोग्य ग्रामसभा आयोजनामुळे झालेले सकारात्मक निर्णय व बदल खालीलप्रमाणे**

- भिवपुरी वाडीतील ग्रामस्थांनी आरोग्य ग्रामसभेमध्ये लक्षणीय सहभाग नोंदविला. आरोग्य ग्रामसभेमध्ये संदर्भसेवा मिळणेबाबत व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मांडला गेला. त्यावर जनता व प्रशासन यांच्यास्तरावर चर्चा झाली. त्यानंतर पुढील काही दिवसात आदिवासी वाडया वस्त्यांवर पाण्याची सोय झाली व पिण्याच्या पाण्याच्या प्रश्न सुटला.
- भिवपुरी गावात आरोग्य ग्रामसभा झालेली नव्हती. आरोग्य ग्रामसभा नियोजनाबद्दल उदासीनता होती. ग्रामस्थांच्या पुढाकाराने गावात आरोग्य ग्रामसभेचे यशस्वी आयोजन केले.
- गावातील पिण्याच्या पाण्याच्या तोट्या बराच काळ नादुरुस्त होत्या. ग्रामसेवकांनी तोट्या नादुरुस्त असल्याची इतिवृत्त रजिस्टरमध्ये नोंद घेतली व तातडीने तोट्यांची दुरुस्ती करण्यात आली.
- भिवपुरी गावातआरोग्य ग्रामसभा झालेली नव्हती. आरोग्यग्रामसभा नियोजनाबद्दल उदासीनता होती. ग्रामस्थांच्या पुढाकाराने गावातआरोग्य ग्रामसभेचे यशस्वी आयोजन केले.

**जिल्हा- रायगड**
**तालुका –कर्जत**
**प्राथमिक आरोग्य केंद्र- खांडस**
**गाव –खांडस**
**स्वयंसेवी संस्था - दिशा केंद्र**
**आरोग्य ग्रामसभा दिनांक-२२/०५/२०१९**



रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील खांडस गाव ११ वाड्या वस्त्यांवर विस्तारलेले आहे. खांडस गावात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न बिकट, पाण्यासाठी लोकांची रोजची वणवण!

**आरोग्य ग्रामसभा आयोजनामुळे झालेले सकारात्मक निर्णय व बदल खालीलप्रमाणे**

- खांडस गावातील प्राथमिक आरोग्य केंद्रस्तरीय जनसंवादाचा परिणाम म्हणून ११ वाडी वस्तीवरील आदिवासी बांधवांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न वाडीतील लोकांनी आरोग्य ग्रामसभेमध्ये पुन्हा मांडला.
- सरपंच व ग्रामसेवक ह्यांचे उपस्थितीत टँकरने पाणी पुरवठ्याविषयीचा ठराव आरोग्य ग्रामसभेमध्ये मंजूर करण्यात आला व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटला.

---

**जिल्हा- रायगड**
**तालुका –सुधागड**
**प्राथमिक आरोग्य केंद्र- नांदगाव**
**उपकेंद्र- नांदगाव**
**स्वयंसेवी संस्था - प्रवास संस्था**
**आरोग्य ग्रामसभा दिनांक - ०३/५/२०१९**



आरोग्य ग्रामसभा उपकेंद्र नांदगाव येथे आयोजित करण्यात आली.

**आरोग्य ग्रामसभा आयोजनामुळे झालेले सकारात्मक निर्णय व बदल खालीलप्रमाणे**

- आरोग्य ग्रामसभेत सरकारी रुग्णालयातील डॉक्टरांची नियमित उपलब्धता
- नांदगाव उपकेंद्रास प्राथमिक आरोग्य केंद्र मान्यता व मंजूरी
- गावातील प्राथमिक आरोग्य केंद्रात विंचू व सर्पदंशाच्या प्रतिबंध लसीची उपलब्धता
- सुधागड पाली येथे स्त्री व बालरोगतज्ञांची उपलब्धता ह्या विविध विषयांवर ग्रामस्थांनी चर्चा केली.

**ग्रामसभेमध्ये नाही कोणालाच बंदी, निर्णय प्रक्रियेत आहे प्रत्येकाला संधी**

**जिल्हा- अहमदनगर**

**तालुका –संगमनेर**

**प्राथमिक आरोग्य केंद्र- बोटा**

**गाव –आंबीदुमाला**

**स्वयंसेवी संस्था –लोकपंचायत संस्था**

**आरोग्य ग्रामसभा दिनांक -०१/०५/२०१९**



**आरोग्य ग्रामसभा आयोजनामुळे झालेले सकारात्मक निर्णय व बदल खालीलप्रमाणे**

- गरोदर मातांची नियमित तपासणी
- माता व बालक लसीकरण
- बाल संगोपन व तपासणी केंद्र
- १०८ संदर्भीय सेवा उपलब्धी
- मातृवंदन योजनेच्या लाभासाठी विवाह नोंदणी संदर्भातील कागदपत्रांची आवश्यकता
- गावातील ओला व सुका कचऱ्याचे वर्गीकरण व घंटागाडी उपलब्धतता
- नियमित पाणी तपासणी
- लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रिया प्रकल्पांतर्गत आंबीदुमाला गावात विकेंद्रीत आरोग्य नियोजन प्रक्रियेमुळे 'तळ्यापासून ते मळ्यापर्यंत' सर्व प्रक्रियेत ग्रामस्थाचा प्रतिसाद चांगला.
- तालुका पातळीवरील बैठकांनाही ग्रामस्थांची नियमित उपस्थिती व सहभाग लक्षणीय.

---

**जिल्हा- अहमदनगर**

**तालुका –संगमनेर**

**प्राथमिक आरोग्य केंद्र- बोटा**

**गाव –भोजदरी**

**स्वयंसेवी संस्था –लोकपंचायत संस्था**

**आरोग्य ग्रामसभा दिनांक-६/०५/२०१९**



आरोग्य ग्रामसभेस गावाच्या सरपंचाचे विशेष सहकार्य लाभले.

**आरोग्य ग्रामसभा आयोजनामुळे झालेले सकारात्मक निर्णय व बदल खालीलप्रमाणे**

- आरोग्य ग्राम सभेमध्ये आरोग्याच्या योजना लोकांना समजल्या.
- मातृवंदना योजने अंतर्गत पूर्तता करावयाच्या आवश्यक कागदपत्राची पूर्ण माहिती मिळाली.
- ग्रामस्थ आणि अधिकारी यांच्यातील समन्वय वाढला.
- गाळयुक्त शिवार, गाळमुक्त धरण अशा अभियानातून गाव पाणीदार करण्याचा प्रयत्न गावाने एकत्रित येऊन केला.

---

**जिल्हा- अहमदनगर**
**तालुका –संगमनेर**
**प्राथमिक आरोग्य केंद्र- वाळकी**
**गाव –राळेगण म्हसोबा**
**स्व यंसेवी संस्था –सी.एस.आर.डी.संस्था**
**आरोग्य ग्रामसभा दिनांक -०४/०६/२०१९**



आरोग्य ग्रामसभेत उपकेंद्र स्वच्छता व आरोग्याच्या विविध प्रश्नावर चर्चा झाली. ह्या ग्राम सभेला गावातील सर्व ग्रामस्थ, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, शिक्षकवर्ग व शासकीय कर्मचारी ह्यांनी हजेरी लावली.

**आरोग्य ग्रामसभा आयोजनामुळे झालेले सकारात्मक निर्णय व बदल खालीलप्रमाणे**

- ग्रामसभेत ग्रामस्थांनी बऱ्याच महिन्यापासून रेंगाळलेला पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मांडला. कित्येक महिने ह्या प्रश्नाला समाधानकारक उत्तर न मिळाल्याने सर्वचजण राग व्यक्त करत होते.
- ग्रामसेवकांनी ह्या कामी सर्वोतोपरी लागेल ती मदत करण्याचे आश्वासित केले. ग्रामस्थांनीही आरोग्य ग्रामसभेच्या दुसऱ्या दिवशी म्हणजेच दिनांक०५/०६/२०१९ रोजी श्रमदान करुन सामाजिक बांधिलकीच्या जबाबदारीचे चांगले उदाहरण गावा पुढे ठेवले

**जिल्हा- अमरावती**

**तालुका – चांदूर रेल्वे**

**गाव – एकूण ४५ गावात आरोग ग्रामसभा आयोजन**

**स्वयंसेवी संस्था – अपेक्षा होमिओ सोसायटी**

**आरोग्य ग्रामसभा दिनांक - १४/०६/२०१९**

अमरावती जिल्ह्यातील चांदूर रेल्वे तालुक्यात कार्यरत अपेक्षा होमिओ सोसायटी ह्या तालुकास्तरीय संस्थेने माहे मे व जुन २०१९ या कालावधीत ४५ आरोग्य ग्रामसभांचे यशस्वी आयोजन केले.

- आरोग्य ग्रामसभांचे आयोजनात गटविकास अधिकारी ह्यांचा विशेष पुढाकार होता. सुरवातीलाच तालुका पातळीवर ग्रामसेवकांच्या बैठका घेऊन आरोग्य ग्रामसभा आयोजनबद्दलच्या सूचना देण्यात आल्या. गावातील सरपंच आणि ग्राम आरोग्य, पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समिती सदस्यांना आरोग्य ग्रामसभेविषयी अवगत करण्यात आले.
- आरोग्य ग्रामसभांचे नियमित आयोजन आवश्यक
- १४ वा वित्त आयोग निधीतून अंगणवाडी, उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठी स्वच्छता, पाणी व्यवस्थापन इत्यादी नाविन्यपूर्ण उपक्रम आयोजन
- गावातील कमी वजनाच्या मुलांच्या आरोग्याबाबत आढावा
- अंगणवाडी मधील आहार दर्जा सुधारणे अंगणवाडीतील मुलांचे वजन घेत असताना पालकांची उपस्थिती महत्वाची
- आरोग्य सेविकेच्या गावात नियमित भेटी, आरोग्य पोषण दिनी ग्राम आरोग्य पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचा सहभाग आवश्यक
- ग्राम आरोग्य पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती अबंधित निधीचा नियमित विनीयोग व आढावा
- शासकीय योजना विधवा पेन्शन योजना, सामाजिक सुरक्षा योजना, रोजगार उपलब्धी व शिक्षणाच्या संधी याबाबींवर चर्चा करण्यात आली.

**आरोग्य ग्रामसभा आयोजनामुळे झालेले सकारात्मक निर्णय व बदल खालीलप्रमाणे**

- चांदुर रेल्वे तालुक्यामधील सावंगी, संगम, पळसखेड, मांजरखेड, भिलटेक, कळमगाव, चांदुरवाडी ह्या गावातील अंगणवाडीतील मुलांना निकोप वातावरणात शिक्षण घेता यावे ह्यासाठी 'बोलक्या अंगणवाड्यांचा' निर्णय झाला. १४ वा वित्त आयोग निधीतून ह्या अंगणवाडी नुतनीकरणाबाबत निर्णय व कार्यवाही झाली.
- आमला विश्वेश्वर येथे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या समोरील कचऱ्याचे ढिगारे उचलण्याचा निर्णय ग्रामपंचायत सदस्यांनी घेतला.
- ग्रामस्तरावर किटकनाशक फवारणी करण्याचा निर्णय झाला.
- ग्रामपंचायतीच्या बाहेरील दर्शनी भागात पाणी तपासणी अहवाल लावण्याचा निर्णय ग्रामस्थांनी घेतला
- साथीच्या आजारांवर प्राथमिक औषधोपचार करण्याकरिता आशा कार्यकर्तीकडे औषधसाठा उपलब्धतेसंबधी प्राथमिक आरोग्य केंद्र आमला, घूईखेड, पळसखेड प्राथमिक आरोग्य केंद्रांबरोबर पत्रव्यवहार करण्यात आला.

---

**जिल्हा- अमरावती**
**तालुका – अचलपूर**
**उपकेंद्र – काकडा**
**गाव – काकडा**
**स्वयंसेवी संस्था – डिव्होटेड संस्था**
**आरोग्य ग्रामसभा दिनांक - १६/०६/२०१९**

**आरोग्य ग्रामसभा आयोजनामुळे झालेले सकारात्मक निर्णय व बदल खालीलप्रमाणे**

आरोग्य ग्रामसभेमध्ये घरासमोरील कचऱ्यांचे ढिगारे व परिसर स्वच्छतेबाबत ग्रामस्थांनी चर्चा केली. १४ वा वित्त आयोग निधीतून डेंग्यूसारख्या आजारावर जंतूनाशक औषधांची नियमित फवारणी संदर्भातील ठराव ग्रामसभेत मंजूर झाला.

जिल्हा- अमरावती
तालुका – अचलपूर
प्राथमिक आरोग्य केंद्र –येसूर्णा
गाव – निबांरी
स्वयंसेवी संस्था – डिव्होटेड संस्था
आरोग्य ग्रामसभा दिनांक - २९/०५/२०१९

**आरोग्य ग्रामसभा आयोजनामुळे झालेले सकारात्मक निर्णय व बदल खालीलप्रमाणे**

- आरोग्य ग्रामसभेच्या सुरुवातीस ग्राम आरोग्य सभासंदर्भातील शासन परिपत्रकाचे वाचन झाले.
- साथीच्या आजाराबद्दल ग्रामस्थांनी चर्चा केली.
- गावातील पिण्याच्या पाण्याचे नमुने नियमित तपासले जावेत ह्या ग्रामस्थांच्या मागणीवर दिनांक ०२/०६/२०१९ रोजी आरोग्य सहाय्यक यांनी तात्काळ कार्यवाही केली.
- गावात आर.ओ.युनिट बसविण्याचा निर्णय घेण्यात आला.
- गावातील आशाताई कडे पुरेसा औषधी साठा उपलब्धतेबद्दल ग्रामसभेत चर्चा झाली.
- लोकाधारित देखरेख नियोजन प्रक्रियेमुळे जंतूनाशक फवारणी, नाले सफाई, घन कचरा व्यवस्थापन ह्या मुद्द्यांबाबत सर्व ग्रामस्थांनी एकत्रित काम करण्याचा निर्णय घेतला.
- आरोग्य ग्रामसभेमुळे गावात आरोग्याच्या विविध प्रश्नावर जनजागृती व चर्चा होऊ लागली.

---

जिल्हा- चंद्रपूर
प्राथमिक आरोग्य केंद्र – घुग्गुस/ चिचपल्ली/ दुर्गापुर
गाव – नकोडा,शेणगाव/ वायगाव, पिंपळखुट/ चोरगाव/
स्वयंसेवी संस्था – प्रकृती महिला विकास केंद्र
आरोग्य ग्रामसभा कालावधी - मे व जुन २०१९




**आरोग्य ग्रामसभा आयोजनामुळे झालेले सकारात्मक निर्णय व बदल खालीलप्रमाणे**

- वायगाव गावातील पिण्याच्या पाण्याचा प्रलंबित प्रश्न सुटला.
- शासनाने ० ते ३ वयोगटातील मुलांसाठी चालविलेली पाळणाघरे वर्षभर चालु रहाण्यासाठी

ग्रामस्थानी पुढाकार घेतला.

- प्राथमिक आरोग्य केंद्र चिचपल्ली पासुन १८ कि.मी. व दूर असलेले चोरगाव हे ताडोबा अभयारण्यातील 'बफरझोन' मध्ये येते. चोरगाव सरकारी दवाखान्याचा प्रस्ताव ग्रामस्थांनी आरोग्य ग्रामसभेत मंजूर करण्यात आला.
- चोरगाव अंगणवाडी क्रमांक २ विजेचे बिल भरण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीने घेतली.
- चोरगाव ग्रामपंचायतीने आडेगाव व मामला ह्या दोन गावातील अंगणवाडीत सौर दिवे बसविले.

---



**जिल्हा- चंद्रपूर**
**तालुका – जिवती**
**प्राथमिक आरोग्य केंद्र – पाटण व जिवती**
**गाव – १८ गावांमध्ये**
**स्वयंसेवी संस्था – बहुउद्देशीय आदिवासी ग्रामीण विकास संस्था**
**आरोग्य ग्रामसभा कालावधी - ५ मे ते १५ जून २०१९**

- निरक्षरता, आर्थिक व सामाजिक मागासलेपणा, अंधश्रद्धा, व्यसनाधीनता यामुळे आरोग्याबाबत आदिवासी लोकांमध्ये उदासिनता आहे.
- लोकाआरोग्य व आरोग्य शिक्षण ह्याबाबत जनजागृतीची गरज आहे. हमीच्या आरोग्य सेवांबद्दल म्हणावी अशी जागरुकता लोकांमध्ये दिसून आली नाही.
- रस्ते, पिण्याचे पाणी व वीज ह्या पायाभूत सुविधांचा अभाव व गैरसोयीचा थेट परिणाम आदिवासी समाजाच्या आरोग्य व शिक्षणावर झालेला दिसून येत आहे.

**आरोग्य ग्रामसभा आयोजनामुळे झालेले सकारात्मक निर्णय व बदल खालीलप्रमाणे**

- आरोग्य ग्रामसभेची पार्श्वभूमी, संकल्पना, उद्दीष्टे व आरोग्य ग्रामसभा संदर्भातील शासन परिपत्रकाचे वाचन झाले.
- काकबन, मरकागोंदी, घाटराईगुडा व घनपठार गावातील आयोजित आरोग्य ग्रामसभातून गरोदर माता व बालके ह्यांचे आरोग्य व लसीकरण, कुपोषण संबधित योजनांची माहिती ग्रामस्थांना देण्यात आली.

- पाटागुडा व घाटराई गुडा ही जिवती तालुक्यातील पाटण प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत येणारी व अतिशय दुर्गम भागात वसलेले आदिवासी पाडे दळणवळणाची कुठलीच व्यवस्था ह्या गावातून नाही. आरोग्य ग्रामसभेत ग्रामस्थांनी पिण्याचा पाण्याचा समस्या मांडली.
- आरोग्य सेवांवर लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रिया अंतर्गत व गावातील ग्रामस्थांच्या पाठपुराव्यामुळे ह्या दोन्ही पाड्यात पाण्याच्या टाक्या बांधल्या गेल्या. लोकांचा पाण्याचा प्रश्न मिटला. आरोग्य ग्रामसभांमुळे हे शक्य झाले आहे.
- घाटराईगुडा मधील रस्ते कच्चे, त्यामुळे गावात १०८ ही संदर्भ सेवा मिळण्यात अडचण येत होती. आरोग्य ग्रामसभेत ह्याविषयी चर्चा झाली. पाटण प्राथमिक आरोग्य केंद्रात ग्रामस्थांनी संपर्क केला असता गावात आता मधल्या रस्त्याने म्हणजे पल्लेधारी मार्गे १०८ गाडी नियमित येत आहे. आरोग्य ग्रामसभेमुळे हे शक्य झाले.
- गोंड गुड्यातील आरोग्य ग्रामसभेत बोअरवेल नादुरुस्तीचा विषय प्राधान्यक्रमाने चर्चेला आला. ग्रामपंचायतीने लगेच बोअरवेल दुरुस्तीचा निर्णय घेतला व बोअरवेल दुरुस्त झाली. ग्रामस्थांना आता नियमित पाणी मिळू लागले.





# राष्ट्रीय आरोग्य अभियान

ग्राम करण्या विकासाला, खेडे ,पाडी आणि वाडीला,
राष्ट्रीय आरोग्य अभियान आहे आपुल्या जोडीला !

या आदिवासी भागाचा करू विकास लोकांचा
ध्यास आहे शासनाचा सर्वांगीण विकासाचा
योजना आली ही आता आपुल्या गावाला !

रुग्ण समिती स्थापन करू , त्याची माहिती सर्वाना देवू ,
ग्रामविकासाचे निर्णय घेवू , सामाजिक अंकेक्षण ठेवू
मग शंकाच नको ही आपल्या मनाला !

स्वच्छ ,सुंदर गाव राहणी करू रुग्णांची हो पाहणी
हेवादेवा आणू नका कोणी , एकोपा असू दया मनी
वैद्यकीय अधिकारी लोकाधारीत विकासाला !

उज्जेन भाऊ करी विनवणी घ्या योजना समजावुनी
ध्यान देवून सर्वांनी जबाबदारी हो पेलूनि
सेवा मिळेल हो खास गोरगरीब जनतेला !

**श्री. उज्जेन शिरसाट**
**जिल्हा समन्वयक दिशा केंद्र**
**आरोग्य सेवांवर लोकाधारित व नियोजन प्रकल्प**
**तालुका कर्जत, जिल्हा रायगड**



संगमनेर तालुक्यात विशेष आरोग्य ग्रामसभांच्या आयोजनामुळे शासकीय आरोग्य यंत्रणा व ग्रामस्थ ह्यांच्यामध्ये सुसंवाद वाढला. ही अतिशय अभिनंदनीय बाब आहे. जनआरोग्यासाठी विविध शासकीय योजना व यंत्रणा कार्यरत आहे परंतु प्रभावी अंमलबजावणी करणेसाठी लोकांचा सहभाग व विश्वास अत्यंत आवश्यक बाब आहे. हा सहभाग व विश्वास सेवाभावी वृत्तीनेच वाढवणे शक्य आहे. लोकपंचायत सारख्या स्वयंसेवी संस्थेच्या प्रयत्नातून **विशेष आरोग्य ग्रामसभा** ह्या अत्यंत स्तुत्य उपक्रमातून सकारात्मक प्रभावी सुसंवाद घडून आला. ज्या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कार्य क्षेत्रात अशा विशेष आरोग्य ग्रामसभा झाल्या आहेत तेथे खुप सकारात्मक बदल घडून आले आहेत. काही भौतिक सुविधा लोक सहभागातून मार्गी लागल्या आहेत. शासकीय कर्मचारी व अधिकारी आस्थेने सेवा उपलब्ध करून देत आहेत.

**श्री. सिताराम राऊत**
**जिल्हा परिषद सदस्य, अहमदनगर**
**तालुका देखरेख व नियोजन समिती सदस्य, संगमनेर**



ग्राम आरोग्य सभेचे आयोजन दुर्गापूर प्रा.आ. केंद्र अंतर्गत चोरगाव, किटाळी, आगरझरी येथे करण्यात आले. ग्राम आरोग्य सभेच्या माध्यमातून गावातील बरेच आरोग्याचे प्रश्न लोकसहभागातून सुटू लागले जसे की, अंगणवाडीत लाईट नसल्यामुळे पंखे नाहीत त्यामुळे लाभार्थ्याला व कर्मचार्यांना गर्मीचा त्रास होतो. करीता आरोग्य ग्राम सभेत प्रस्ताव पारित करण्यात येवून ग्रामपंचायतीच्या निधीतून चोरगाव येथे लाईट मीटर बसवून पंखे लावण्यात आले. तसेच मामला, अडेगाव येथे सौर उर्जेच्या माध्यमातून वीज व्यवस्था करण्यात आली. आरोग्य ग्रामसभेच्या माध्यमातून लोकांचे प्रश्न सुटतात व लोकांचा सरकारी आरोग्य सेवांवर विश्वास वाढतो.

**डॉ. अमित जयस्वाल**
**प्रभारी तालुका वैद्यकीय अधिकारी,**
**प्रा. आ. केंद्र, दुर्गापूर, जि. चंद्रपूर**